# रायगड जिल्हा परिषद शाळा - पालेखूर्द

**मु.पालेखूर्द पो.देविचापाडा ता.पनवेल जि.रायगड**

# आभार पत्र

प्रति,

मा.व्यवस्थापक साहेब,
लक्ष्मी चॅरीटेबल टस्ट,पनवेल
ता.पनवेल जि.रायगड
यांस सविनय सादर

द्वारा:- मुख्याध्यापक रा.जि.प.शाळा-पालेखूर्द,ता.पनवेल जि.रायगड

विषय :-आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केल्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आमच्या रायगड जिल्हा परिषद शाळा-पालेखूर्द मु. पालेखूर्द पो. देविचापाडा ता.पनवेल जि.रायगड येथे आपल्या **'लक्ष्मी चॅरीटेबल टस्ट,पनवेल ता.पनवेल जि. रायगड'**यांच्या माध्यातुन आमच्या शाळेतील विध्यार्थ्यांना आपल्याकडुन वेळोवेळी मदत होत असते. तसेच चालु सन २०२२—२०२३ या शैक्षणिक वर्षामध्ये आपल्याकडून आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत डोळे तपासणी व चष्मे वाटप शिबिर आयोजित करुन आमच्या शाळेत शिकणा-या गरिब व गरजु विद्यार्थ्यांच्या डोळयासारख्या अवयवाची आपण तपासणी करुन घेतल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना त्याचा फायदा झाला अनेक विद्यार्थ्यांचे डोळयामध्ये असणारे दोष दिसुन आले. आज आरोग्य शिबिर तुमच्या माध्यमातुन पुर्ण झाले.आपल्या चॅरीटेबल टस्ट च्या माध्यमातून आपण खरोखर विध्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेउन त्यांच्या शिक्षणासाठी मोलाचे सहकार्य केल्याबददल आमची शाळा सदैव आपली ऋणी आहे.

तरी,आपण शाळेतील विध्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केल्याबद्दल आम्ही आमच्या शाळेतर्फे व गावातर्फे आपले मनापासुन आभारी आहोत.

**आपले शतश: धन्यवाद! आम्ही आपले खूप ऋणी आहोत.**

**धन्यवाद!**

आपला विश्वासु

मुख्याध्यापक
रा. जि. प. शाळा पालेखूर्द
ता. पनवेल, जि. रायगड.